Scan QR code
to visit...
Epaper Portal

दैनिक
www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ७५ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.८ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code
to visit...
Epaper Portal

## सत्ता येते–जाते,आपल्याला देश महत्त्वाचा

# नवाब मलिक महायुतीत नको, देवेंद्र फडणवीस यांचं अजित पवार यांना पत्र

**नागपूर : राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिकांवरून अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधानपरिषदेत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चांगलीच जुंपली. नवाब मलिक यांनी सत्ताधारी बाकांवर बसून अप्रत्यक्षरित्या अजित पवार गटाला म्हणजेच महायुतीला पाठिंबा असल्याची भूमिका स्पष्ट केली. मात्र दुसरीकडे नवाब मलिक यांना राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षात घेण्यावरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आक्षेप आहे. सत्ता येते–जाते, आपल्याला देश महत्त्वाचा, नवाब मलिक यांना महायुतीत घेणे योग्य नाही, अशा आशयाचं पत्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना लिहिलं आहे.**



महाराष्ट्र विधिमंडळ हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधान परिषदेत नवाब मलिक यांच्या सत्ताधारी बाकांवर बसण्यावरून भाजप आणि शिवसेना (ठाकरे गट) या दोन पक्षांमध्ये जोरदार वाकयुद्ध झालं. ज्यांच्यावर तुम्ही देशद्रोहाचे आरोप केले, त्यांनीच आता सरकारला पाठिंबा दिलाय? हा पाठिंबा तुम्हाला कसा काय चालतो? असे सवाल उपस्थित करून ठाकरे गटाने भाजपची कोंडी केली. त्यानंतर काहीच तासांत देवेंद्र फडणवीस यांनी अजितदादांना पत्र लिहून नवाब मलिक महायुतीत नको, अशी भूमिका मांडली आहे.माजी मंत्री आणि विधानसभा सदस्य श्री. नवाब मलिक हे आज विधिमंडळ परिसरात येऊन कामकाजात सहभागी झाले होते. विधानसभा सदस्य म्हणून त्यांचा तो अधिकार मुद्दा आहे, त्यांच्याबाबत आमची वैयक्तिक शत्रूता किंवा वैयक्तिक आकस अजिबात नाही, हे मी प्रारंभीच स्पष्ट करतो. परंतु, ज्या पद्धतीचे आरोप त्यांच्यावर आहेत, ते पाहता, त्यांना महायुतीमध्ये घेणे योग्य उरणार नाही, असे आमचे मत आहे.सत्ता येते आणि जाते, पण सत्तेपेक्षा देश महत्वाचा आहे. सद्या ते केवळ वैद्यकीय आधारावर जामीन मिळाल्याने बाहेर आहेत, त्यांच्यावरील आरोप सिद्ध न झाल्यास आपण त्यांचे जरूर स्वागत करावे, मात्र अशाप्रकारचे आरोप असताना त्यांना महायुतीचा भाग करणे, हे योग्य होणार नाही, असे आमचे स्पष्ट मत आहे. आपल्या पक्षात कोणाला घ्यायचे, हा सर्वस्वी आपला अधिकार आहे, हे मान्यच आहे. परंतु, त्यामुळे महायुतीला बाधा पोहोचणार नाही, याचा विचारही प्रत्येक घटक पक्षांना करावाच लागत असतो, त्यामुळे आमचा या गोष्टीला विरोध आहे.त्यांना देशद्रोह्यांशी संबंध असल्याच्या आरोपाखाली अटक झाली तरी त्यांना मंत्रिपदावर कायम ठेवणाऱ्या तत्कालिन मुख्यमंत्री आणि महाविकास आघाडी सरकारच्या विचाराशी आम्ही सहमती दाखवू शकणार नाही. आपण आमच्या भावनांची नोंद घ्याल, अशी मला आशा आहे.

## वरोरा येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त आमदार प्रतिभा धानोरकर यांनी केले डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



**वरोरा । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला महापरिनिर्वाण दिनानिमित्त आमदार प्रतिभा धानोरकर यांनी पुष्पचक्र वाहून अभिवादन केले. यावेळी वरोरा शहर काँग्रेस अध्यक्ष तथा वरोरा नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष विलास टिपले, वरोरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती राजू चिकटे, माजी नगरसेवक राजू महाजन, काशिफ खान, अय्युब पठाण, प्रदीप घागी, बंटी बहादे आदी उपस्थित होते.यावेळी आमदार प्रतिभा धानोरकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या की, डॉ. आंबेडकर हे एक महान समाजसुधारक, कायदेपंडित, विचारवंत होते. त्यांनी आपल्या आयुष्यात अनेक सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी आणि दलितांच्या हक्कांसाठी लढा दिला. त्यांनी भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणूनही आपले नाव इतिहासात कोरले आहे.आमदार धानोरकर यांनी पुढे म्हटले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे अनुसरण करून आपण आपल्या जीवनात सामाजिक न्याय आणि समतेचा प्रसार केला पाहिजे. त्यांनी आपल्या जीवनात कधीही कोणत्याही अडथळ्यांना घाबरले नाही. त्यांनी कठोर परिश्रम करून आपल्या जीवनात यश मिळवले. आपण त्यांच्या या विचारांचे अनुसरण करून आपल्या जीवनात यशस्वी होऊ शकतो.

## राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेमध्ये गोवा संघाला प्रथम क्रमांक व महाराष्ट्र संघ उपविजेता

**नागपूर । प्रतिनिधी**

टेनिस क्रिकेट असोसिएशन ऑफ इंडिया व टेनिस क्रिकेट असोशिएशन महाराष्ट्र आणि नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन नाशिक याच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित पाचवी राष्ट्रीय सब जुनिअर टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा नाशिक येथील म्हसरूळ क्रिकेट मैदान येथे उत्साहात संपन्न झाली. यामध्ये गोवा संघ प्रथम क्रमांक महाराष्ट्र संघ उपविजेता तर मुंबई संघाला तिसरा क्रमांक मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व जिल्ह्यातून खेळाडूंचे अभिनंदन होत आहे. या स्पर्धेच्या उदघाटनप्रसंगी भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष कन्हैया गुजर, भारतीय सचिव मिनाक्षी गिरी ,महाराष्ट्र वुमन डायरेक्टर धनश्री गिरी ,गोवा सचिव पंकज सावंतनाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड ,विलास गिरी.महेश मिश्रा,सदिप पाटील,विजय बिराजदार आदि मान्यवर उपस्थित होते.यावेळी इंडिया टेनिस क्रिकेट असोसिएशनचे सचिव मिनाक्षी गिरी यांनी विद्यार्थ्यांना टेनिस क्रिकेट खेळाबद्दल माहिती व त्याचे महत्त्व सांगितले. या स्पर्धेसाठी संपूर्ण भारतातून मुलांचे ११संघ उपस्थित होते. टेनिस क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना गोवा विरुद्ध महाराष्ट्र असा झाला. यामध्ये .गोवा च्या खेळाडूंनी उत्स्फूर्तपणे कामगिरी करत संघाला विजयश्री



मिळवून दिला व महाराष्ट्र संघाने चांगले प्रयत्न करून या अंतिम सामन्यात चांगली चुरस निर्माण करून उपविजेता ठरला. या स्पर्धेमध्ये नाशिकचा सत्यम पांडे उत्कृष्ट गोलंदाज म्हणून सन्मानित करण्यात आले.त्याचप्रमाणे सर्वोत्कृष्ट फलंदाज ओमकार गोवा आणि मालिकावीर लोकेश मराठे यांना चषक देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र संघाला उपविजेतेपद व मुंबई मुलाच्या संघाला तिसरा क्रमांक मिळाल्याबद्दल भारतीय टेनिस क्रिकेट च्या महासचिव मिनाक्षी गिरी, ,महाराष्ट्र वुमन डायरेक्टर धनश्री गिरी ,महाराष्ट्र टेक्निकल डायरेक्टर स्वप्निल ठोंमरे ,विलास गिरी व नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड या सर्वांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. या स्पर्धेसाठी पंच म्हणून भूषण गावकर, ओमकार पवार,दर्शन थोरात, लखन देशमुख, सुमन गौडा यांनी काम केले. तसेच संघाच्या मार्गदर्शक म्हणून , महेश मिक्षा महाराष्ट्र मार्गदर्शक व मुंबई मार्गदर्शक सिद्धेश गुरव या सर्वांनी अथक परिश्रम घेतले.

## विकसित भारत संकल्प यात्रेचा उपक्रम राज्यात प्रभावीपणे राबविण्यात यावा–मुख्यमंत्री शिंदे

**नागपूर । प्रतिनिधी**

समाजातील सर्वसामान्य घटकांच्या कल्याणासाठी केंद्र शासनाने विविध योजना सुरु केल्या आहेत. त्या लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून विकसित भारत संकल्प यात्रा हा महत्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. या यात्रेच्या माध्यमातून नागरीकांना विविध योजनांचा लाभ मिळणार असल्याने या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ७ डिसेंबर ला दिले.मुख्यमंत्री शिंदे यांनी रामगिरी येथे विकसित भारत संकल्प यात्रेच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. त्यावेळी राज्यातील सर्व जिल्हा प्रशासनांना याबाबत विस्ताराने सुचना दिल्या. या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दुरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. मुख्य सचिव मनोज सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिन भुषण गगराणी, प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांच्यासह विविध



विभागाचे अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव तसेच दुरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलिस अधीक्षक उपस्थित होते.केंद्र शासनाच्या अनेक फ्लॅगशिप योजनांपासून अजूनही काही लाभार्थी वंचित आहेत. या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवून त्यांना योजनांची माहिती व लाभ देण्यासाठी संपुर्ण देशभर हा यात्रेचा उपक्रम राबविली जात आहे. समाजातील सर्वच घटकातील वंचित लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी राबविण्यात येत असलेली ही मोहिम राज्यात प्रभावीपणे राबवा. जास्तीत जास्त लाभार्थ्यांना उपक्रम काळात लाभ देण्याच्या सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी केल्या.जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यात हा उपक्रम अधिक चांगल्या पद्धतीने कसा राबविता येईल, याकडे लक्ष दिले पाहिजे. यात्रेचा जनजागृती रथ गावांमध्ये जात असतांना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्याठिकाणी उपस्थित राहून आपल्या योजना गावकऱ्यांना समजावून सांगितल्या पाहिजे.

या उपक्रमाच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र देशात आघाडीवर राहील, यासाठी ग्राम स्तरावर काम करणाऱ्या सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येक पात्र लाभार्थ्यांस या उपक्रम कालावधीत विविध योजनांचा लाभ मिळाला पाहिजे, असे सांगितले. उपक्रमाच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र आघाडीवर असला पाहिजे. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी हा उपक्रम अतिशय महत्वाचा ठरणार आहे, असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील हा उपक्रम राज्यात प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना केल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी आपआपल्या जिल्ह्यांमध्ये हा उपक्रम राबवितांना जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याचा प्रयत्न करावा, असे सांगितले. मुख्य सचिव मनोज सौनिक यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडून उपक्रमाच्या अंमलबजावणीची माहिती घेतली. केंद्र शासनासह राज्याच्या योजनांची देखील या कालावधीत जनजागृती केली जावी, असे त्यांनी सुचविले.

## संपादकीय

# अहंकाराचे वारे!

राजकारणात मुख्य ध्येय गाठण्यासाठी काही लवचिकता ठेवावी लागते. पण हे भान विसरून पक्षीय आणि वैयक्तिक अहंकारच डोके वर काढत अहेत.मध्य प्रदेश, राजस्थान तसेच छत्तीसगड या हिंदी भाषिक पट्ट्यातील तीन राज्यांवर भारतीय जनता पक्षाने कब्जा केल्यानंतरच्या अवघ्या ४८ तासांत 'इंडिया' या विरोधकांच्या आघाडीतील दुराव्याची दरी अधिकच रुंदावत चालल्याचे चित्र उभे राहिले. पाच राज्यांतील विधानसभा निकाल आणि चार महिन्यांवर येऊन ठेपलेल्या लोकसभा निवडणुका यांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसअध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी या आघाडीची बैठक बुधवारी आयोजित केली होती.मात्र, 'आपण या बैठकीस जाणार नाही!' असे पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारीच जाहीर केले होते. आता समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव आणि संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष व बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनीही या बैठकीकडे पाठ फिरवली. याचा अर्थ स्पष्ट आहे.या तिन्ही राज्यांत काँग्रेसने याच 'इंडिया' आघाडीतील अन्य काही पक्षांशी काही मोजक्या जागांसाठीही तडजोड करण्यास नकार देत 'एकला चलो रे...' अशी भूमिका स्वीकारली होती. ही भूमिका आडमुठेपणाची जशी होती, त्याचबरोबर कर्नाटकात दणदणीत विजय मिळवल्याने एकदम अंगात शिरलेल्या अहंकाराच्या वाऱ्याचे दर्शन घडवणारी होती.अखिलेश यांनी वाराणसीतील एका कार्यक्रमात बोलताना 'आता निकाल आल्यामुळे अहंकाराचे वारेही उतरले असणार!' असे उपरोधिक उद्गार काँग्रेसचे नाव न घेता काढले होते. खरे तर ममतादीदींनी यापूर्वी काँग्रेसच्या जातनिहाय जनगणनेला पाठिंबा देण्याच्या काँग्रेसच्या निर्णयाला विरोध करून आघाडीतील मतभेदांना तोंड फोडले होतेच. आता तर त्यांनी थेट या बैठकीकडेच पाठ फिरवली आहे.नितीश कुमार यांनी तर खर्गे यांनी त्यांना केलेल्या फोनवरच बैठकीसाठी येण्याची असमर्थता व्यक्त केली. मात्र, बिहारमधील नितीश कुमार यांच्यासमवेत सत्तेत सहभागी असलेल्या राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव हे मात्र खर्गे यांच्या बैठकीस जातीने उपस्थित राहणार होते. तर अखिलेश बहुधा आपले काका रामगोपाल यादव यांना या बैठकीस धाडतील, अशी चिन्हे होती. आता बैठक लांबणीवर पडल्याने पुढे किती फाटे फुटतात, हे पाहावे लागेल.या तीन राज्यात आलेल्या अपयशामुळे या आघाडीतील काँग्रेसची पत कशी घसरली आहे, त्यावरच या बहिष्कारसत्रामुळे शिक्कामोर्तब झाले असले तरी त्यामुळे या आघाडीचे नेतृत्व कोणी करायचे, हाच प्रश्न आता आ वासून उभा राहिला आहे. नितीश असो की ममतादीदी, या दोघांनीही आघाडीचे नेतृत्व करण्याची महत्त्वाकांक्षा कधीच लपवून ठेवली नव्हती आणि काँग्रेस आघाडीत घेऊ पाहत असलेली 'मोठ्या भावा'ची भूमिका तर कोणासच मान्य नव्हती.मात्र, काँग्रेसचा या तीन राज्यांत जबर पराभव घाला असला तरी या पक्षाने प्रत्येक राज्यात ४० टक्क्यांच्या आसपास मते घेतली आहेत, याकडे आघाडीतील अन्य पक्षांनी दुर्लक्ष करणे, त्यांना परवडणारे नाही. तसे करणे हेही एका अर्थाने अहंकारी वृत्तीचेच दर्शन घडवणारे असेल. त्यामुळे या आघाडीतील सर्वच पक्षांनी आता सामंजस्य तसेच सामोपचार या दोन मंत्रांचा जप करतच लोकसभा निवडणुकीला तोंड देणे, हेच त्यांच्यासाठी हिताचे ठरणार आहे.एकीकडे 'इंडिया' आघाडीतील मतभेद अशा रीतीने चव्हाट्यावर येत असताना, महाराष्ट्रातील सत्ताधारी 'महायुती'तही सारे काही आलबेल नाही, असेच चित्र गेल्या चार-सहा दिवसांत उभे राहिले आहे. प्रथम शिवसेना आणि पुढे राष्ट्रवादी काँग्रेस या दोन राज्यांतील मोठ्या पक्षांत फूट पाडून भाजपने सत्ता मिळवली खरी; पण त्याची किंमत त्यांना मुख्यमंत्रिपदावर पाणी सोडून चुकती करावी लागली आहे.तेव्हाच भाजपचे राज्यातील बडे नेते यांनी 'हा निर्णय आम्ही छातीवर दगड ठेवून स्वीकारला आहे,' अशी खंत जाहीरपणे बोलून दाखवली होती. मात्र, तीन राज्यांत मोठा विजय मिळवताच भाजप नेत्यांना लगेचच स्फुरण चढले असून प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी भंडाऱ्यातील एका कार्यक्रमात बोलताना, २०२४ मध्ये पुन्हा देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होतील, असे जाहीरपणे कार्यकर्त्यांकडून वदवून घेतले.तर त्यानंतरच्या काही तासातच सरकारमध्ये सामील असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटाचे नेते अमोल मिटकरी यांनी '२०२४ मध्ये अजित पवार हेच मुख्यमंत्री असतील!' अशी दवंडी पिटली. त्यामुळे एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस-अजित पवार यांच्या या तीन इंजिनांच्या सरकारात कशा प्रकारची 'एकवाक्यता' आहे, तेच पटलावर आले!त्याचवेळी जवळपास २०० आमदारांच्या पाठिंब्यावर उभे असलेले हे सरकार शिवसेना तसेच राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांतील फुटीर आमदारांच्या अपात्रतेची सुनावणी सुरू असल्याने अधांतरीच असल्याचे जनतेला कळून चुकले आहे. शिवाय, शिवसेना तसेच 'राष्ट्रवादी' या दोन्ही पक्षांतील फुटीनंतर तर मूळ पक्ष कोणाचा या वादाने तर शिग गाठली असून, त्यास नळावरील भांडणाचे स्वरूप आले आहे.गेल्याच आठवड्यात अजित पवार यांनी केलेले कथित गौप्यस्फोट आणि त्यास शरद पवार यांनी दिलेला 'करारा जवाब' यामुळे नेमके खरे कोणाचे, असा प्रश्न केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर अवघ्या देशाला पडला आहे. मात्र, आता या तिन्ही पक्ष-गटांची खरी कसोटी लोकसभेतील जागावाटपाच्या वेळी लागणार आहे; कारण भाजप आता लोकसभेच्या जास्तीतजास्त जागांवर दावा करणार हे उघड आहे.त्याचवेळी भाजपच्या या ताज्या यशामुळे मोहरून गेलेल्या मुख्यमंत्री शिंदे यांनी 'मिशन ४८'चा नारा दिला आहे. या अशा घोषणाबाजीच्या गदारोळात कारभाराकडे कुणाचे लक्ष आहे का, हा प्रश्न मात्र अनुत्तरितच आहे.

# लाचखोरीला आळा घालण्यासाठी...



संपूर्ण देशाच्या तुलनेत महाराष्ट्रात लाचखोरी किंवा भ्रष्टाचारप्रकरणी गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. मात्र, हे गुन्हे सिद्ध होऊन दोषींना शिक्षा होण्याचे प्रमाण अजिबातच समाधानकारक नाही. हे प्रमाण वाढण्यासाठी सर्वच घटकांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. त्या प्रयत्नांची दिशा व स्वरूप विशद करणारा लेख.महाराष्ट्रामध्ये लाचखोरीच्या प्रकरणांत लाचलुचपत प्रतिबंधक विभागात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांच्या प्रकरणांमध्ये, गुन्हा सिद्ध होऊन संबंधित आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. लाचखोरी प्रकरणात करण्यात आलेल्या एकूण गुन्ह्यांपैकी ९० टक्के प्रकरणांमध्ये आरोपी सहीसलामत सुटत आहेत. मात्र यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांचे हनन होत आहे. त्याचप्रमाणे सरकारी यंत्रणांच्या साधनांचा आणि वेळेचाही यामुळे अपव्यय होत आहे.हे गुन्हे सिद्ध होऊन दोषींना शिक्षा होण्याचे प्रमाण समाधानकारक नाही. हे प्रमाण वाढण्यासाठी आणि खऱ्या गुन्हेगारांवर आरोप सिद्ध होऊन त्यांना तातडीने शिक्षा होण्यासाठी, केवळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागामधील अधिकारीच नव्हे, तर लोकशाही मूल्यांची बूज ठेवून मानवी हक्काचे संरक्षण करण्यात स्वारस्य असलेल्या फौजदारी न्यायव्यवस्थेतील सर्व घटकांनीही भ्रष्टाचाऱ्यांविरोधात कारवाई करण्याबाबत गांभीर्य दाखविणे आवश्यक आहे.गुजरातेत भ्रष्टाचाराच्या प्रकरणात गुन्हे सिद्ध होऊन शिक्षा होण्याचे प्रमाण ४० टक्के एवढे आहे. अन्य राज्यांतही गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण तुलनेने अधिक आहे. तक्रारदार, साक्षीदार, तपास अधिकारी, न्यायवैद्यक तपासाधिकारी, सरकारी वकील आणि न्यायपालिकेतील अधिकारी यांसारख्या भ्रष्टाचाराशी संबंधित खटल्यातील विविध घटकांवर प्रभावीपणे काम करणे अत्यावश्यक आहे. त्याचप्रमाणे विभागीय चौकशीच्या माध्यमातून लाचलुचपत प्रतिबंधक विभागातही अंतर्गत सुधारणेसाठी विविध पावले उचलावी लागतील.मुळात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे महासंचालकपद रिक्त ठेवता कामा नये. तेथे योग्य व्यक्तीची तातडीने नेमणूक करयला हवी. याचे कारण महासंचालक नसल्यास या संपूर्ण विभागातील यंत्रणेच्या मानसिकतेवर त्याचा नकारात्मक परिणाम होतो. दीड वर्षांहून अधिक काळ हे पद रिक्त आहे.मुख्य सचिवांनी विभागप्रमुखांबरोबर नियमित बैठकी घेऊन भ्रष्टाचाराबाबतच्या खटल्यांमध्ये आवश्यक असणाऱ्या मंजुरी सक्षम अधिकाऱ्याने तत्काळ दिल्या आहेत, याची खात्री करणे आवश्यक आहे. आरोपींचे निलंबनही केले गेले पाहिजे. ज्या पीठासमोर अथवा विशेष न्यायाधीशांसमोर सुनावणी सुरू आहे, त्या न्यायाधीशांनी प्रत्येक महिन्याला किमान पाच खटले तरी निकाली काढावेत, असे निर्देश उच्च न्यायालयाने दिले आहेत.परंतु ही कालमर्यादा क्वचितच पाळली जाते. या झाल्या प्राथमिक सुधारणा. याशिवाय आणखी काही मुद्दे लक्षात घ्यायला हवेत. तक्रारदारावरील दडपण संशयित भ्रष्ट अधिकाऱ्यांना अथवा अन्य कर्मचाऱ्यांना सापळा रचून त्यांचा भ्रष्टाचार उघड केल्यानंतर, तक्रारदारांना कायम एका गोष्टीची चिंता सतावत असते आणि ती म्हणजे सरकारी कार्यालयातील त्यांचे काम आता आडून राहणार.यावर तोडगा म्हणजे, संबंधित प्रकरणाची तपासणी करणाऱ्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्याने तक्रारदाराचे सरकारदरबारी असणारे काम पूर्ण कसे होईल, याकडे स्वतः लक्ष देणे अथवा संबंधित विभागप्रमुखांना लिखित स्वरूपात तक्रारदाराचे काम पूर्ण करण्याबद्दल सूचना करणे. यामुळे तक्रारदार आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील लोकांच्या मनातही आत्मविश्वास निर्माण होईल.दुसरी गोष्ट म्हणजे तक्रारदारावर गुन्हेगार अथवा त्यांच्या साथीदारांकडून कोणताही दबाव येणार नाही, याची काळजी घेणे, यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी तक्रारदाराचे मनोबल वाढविण्यासाठी वारंवार त्याच्याशी संवाद साधणे गरजेचे आहे. संबंधित खटला न्यायालयात दाखल होईपर्यंत तक्रारदाराला कोणतीही अडचण येणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे.न्यायालयात खटला सुरू होण्यापूर्वी तक्रारदाराला घडलेल्या घटना पूर्णपणे आठवत आहेत की नाही, याची चाचपणी करून घ्यावी. नेमके काय घडले आहे, संबंधित अधिकाऱ्याला अथवा कर्मचाऱ्याला पकडण्यासाठी सापळा रचण्यात पूर्वी त्या अधिकाऱ्याकडून अथवा कर्मचाऱ्यांकडून कशा पद्धतीने भ्रष्टाचार सुरू होता, या सगळ्याची उजळणी करून घेणे गरजेचे असते.सापळा रचताना घडलेल्या घटना तक्रारदाराला व्यवस्थित आठवत आहेत की नाहीत, याची खातरजमा करून घेणेही अत्यंत आवश्यक आहे. अशा प्रकरणांतील साक्षीदार हे सर्व सरकारी कर्मचारी असतात. सापळा रचताना जेव्हा त्यांना सहभागी करून घेण्यात येते तेव्हा त्यांचे वय ४५ वर्षांपेक्षा कमी असायला हवे.एखाद्या प्रकरणांमध्ये अशा कोणा अधिकाऱ्यांनी शत्रुत्व घेण्याचा प्रयत्न केला असता त्या अधिकाऱ्याच्या विभागप्रमुखांना त्याच्याविरोधात कारवाई करण्याबाबत सूचना देणे आवश्यक आहे. तपासाधिकाऱ्याला तक्रारींचे स्वरूप समजून घेणे, त्यावर कार्यवाही करणे, सापळा रचणे या सर्वच बाबतीत आणि त्यापुढील प्रक्रिया कशा पद्धतीने केली जाते, कारवाईसाठी आणि सापळा रचण्यासाठी नवनवीन उपकरणे आणि तंत्रज्ञानाचा वापर कशा पद्धतीने केला जाऊ शकतो, याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.एखादे प्रकरण न्यायालयात दाखल होऊन त्यावर सुनावणी सुरू झाली असता संबंधित प्रकरणाच्या तपास अधिकाऱ्याची बदली झालेली असते. अशा परिस्थितीत संबंधित अधिकाऱ्याला खटल्याच्या सुनावणीदरम्यान न्यायालयात हजर राहण्यासाठी दुसऱ्या विभागातून परवानगी मिळणे आणि संबंधित अधिकाऱ्याने सुनावणीदरम्यान वेळोवेळी हजर राहणेही आवश्यक आहे.पुराव्यांबाबत तज्ज्ञांचे मत घेणे, विशेषतः आवाजाच्या नमुन्याबाबत न्यायवैद्यक अधिकाऱ्याचे मत घेणे आवश्यक आहे. यात कोणताही हलगर्जीपणा झाला तर त्याचा खटल्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. यासाठी प्रशिक्षित कर्मचारी आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून द्यायला हवे. यासाठी कर्मचारी नियमित तत्त्वावर कामावर घ्यावेत.कंत्राटी कर्मचारी योग्यवेळी उपलब्ध होतीलच असे नाही.

मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्यांकडे जेव्हा तपासाचा अहवाल सुपूर्द करण्यात येतो, तेव्हा संबंधित प्रकरणात प्रथमदर्शी पुरावा आहेना, हे पाहणे अपेक्षित असते. संबंधित प्रकरणांची कायदेशीर छाननी न्यायपालिकेतील अधिकारी सविस्तर करणार असतात.खरे तर खटले चालवण्याबाबतची मंजुरी दोन महिन्यांत मिळायला हवी. अनेक अधिकारी व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून न्यायालयात साक्ष देतात. या व्हिडिओची गुणवत्ता बरेचदा चांगली नसल्याने त्याचा परिणाम त्या खटल्यावर होतो. यात सुधारणा व्हायला हवी.गुन्हा सिद्ध होण्यामध्ये आणखी एक मोठा अडथळा म्हणजे सरकारी वकिलांची उदासीनता. ही समस्या सोडविण्यासाठी दर सहा महिन्यांनी सरकारी वकिलांना प्रशिक्षण देणे, त्यांना नवे तंत्रज्ञान अवगत करून देणे आणि त्याच्या योग्य वापराबाबत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. तसेच महत्त्वाच्या खटल्यांमधे नाणावलेल्या अभियोक्त्यांची नेमणूक करावी.उच्च न्यायालयाने अतिरिक्त जिल्हा न्यायाधीशांना लाचलुचपत प्रकरणांच्या खटल्यांसाठी विशेष न्यायाधीश घोषित करून त्यांना किमान पाच खटल्यांचा निपटारा करण्याबाबत सूचना दिल्या असल्या तरी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होताना दिसत नाही.काही प्रकरणांत न्यायालयातील अधिकारीही आरोपींना संशयाचा फायदा देऊन निर्दोष सोडत असल्याचे निदर्शनास येते. अशा परिस्थितीत ही बाब उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे. यासाठी दर महिन्याला संचालकांनी त्यांच्या बरोबर बैठकी घेणे आवश्यक आहे.लाचखोर अधिकाऱ्याला पकडण्यासाठी सापळा रचल्यानंतर, संबंधित विभागात प्रशासकीय यंत्रणेत ज्या त्रुटी आढळलेल्या आहेत, त्यावर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच एखादा कर्मचारी दोषी सिद्ध झाल्यानंतर त्याला खात्यातून बडतर्फ का करू नये, ही विचारणा करून त्याच्यावर तातडीने पुढील कारवाई करणे आवश्यक आहे.यात आणखी एक उपक्रम राबवता येईल, तो म्हणजे, प्रत्येक प्रकरणांची प्राथमिक स्तरावर छाननी करताना संबंधित जिल्ह्यातील जवळच्या विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मदत घेता येऊ शकेल. त्यामुळे सुरुवातीच्या टप्प्यात खटल्यातील त्रुटी दूर होण्यास मदत होईल. या उपायांच्या अंमलबजावणीवर वरिष्ठ पातळीवरून लक्ष दिल्यास चित्र नक्कीच बदलेल.

# नगरपरिषदांमध्ये पारदर्शित्वाची आशा



राज्यातील सर्व ३६० नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या सर्वसाधारण सभेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे.या बदलामुळे कामकाजात सुधारणा होण्याची आशा बळावली आहे.नगरपरिषदेच्या कामकाजात पारदर्शकता येण्यासाठी राज्यातील सर्व ३६० नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या मुख्याधिकाऱ्यांनी सर्वसाधारण सभेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करुन ते नगरपरिषदेच्या आणि संचालनालयाच्या संकेतस्थळावरवर सात दिवसांत प्रसिध्द करावे, असे आदेश नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे आयुक्त तथा संचालक डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिले.त्यामुळे नगरपरिषदेच्या सभेत नेमके काय झाले, हे आता नागरिकांना घरबसल्या बघता येणार आहे. या आदेशाचे दूरगामी परिणाम होणार असून खऱ्या अर्थाने नगरपरिषदांचे कामकाज नागरिकांसाठी खुले होण्यास सुरुवात झाली आहे.संसद, विधानमंडळाच्या कामकाजाचे सध्या थेट प्रक्षेपण होत आहे. त्यामुळे नगरपालिकेसारख्या नागरिकांच्या दैनंदिन जिव्हाळ्याच्या नागरी सुविधेशी संबंधित असणाऱ्या संस्थेचे कामकाजही लोकांसाठी खुले झाल्यामुळे लोकशाही मूल्यांमध्ये वृद्धी होणार आहे.नगरपालिकेच्या सभेच्या नियमात सध्या असलेली संक्षिप्त कार्यवृत्तांताची तरतूद ही पारदर्शक कामकाजात अडसर ठरत आहे. त्यामुळे त्यात सुधारणा करुन संपूर्ण इतिवृत्तांत जाहीर करण्याची मागणी होती.तसेच ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार लोकशाही स्वरूपानुसार बदल करून क्षेत्रसभाविषयी कायद्यामध्ये तरतूद करण्यात आली खरी पण त्यानुसार तीन लाखांच्या आत लोकसंख्या असलेल्या नगरपालिकांना प्रभाग समितीची अट आहे.राज्यातील तीन लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या नगरपरिषद-नगरपंचायती या क्षेत्रसभांपासून वंचित असून, लोकशाही स्वरूप आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्य मूल्यानुसार यामध्ये विधानसभेमध्ये धोरणात्मक बदल करणे गरजेचे आहे.नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सभेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करून संबंधित नगरपरिषद-नगरपंचायतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे आदेश डॉ. किरण कुलकर्णी, आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी दिले.आजच्या काळात प्रशासनात लोकशाही मूल्यानुसार काम करणारे असे प्रामाणिक अधिकारी कमीच आहेत. परंतु या आदेशाची अंमलबजावणी महाराष्ट्रात फक्त सोलापूर जिल्ह्यातील बार्शी नगरपरिषदेमध्ये झाली.बार्शी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक बाळासाहेब चव्हाण संविधानिक लोकशाही मूल्यानुसार प्रशासनाला मार्ग दाखवत असल्याने सभेचे थेट प्रक्षेपण फेसबुक लाईव्हद्वारे करण्याचा निर्णय घेतला, याचे कौतुक करावे तेवढे कमीच.राज्यातील इतर नगरपरिषद व नगरपंचायतींनीही हा कित्ता गिरवत आपले कामकाज नागरिकांसाठी खुले करायला हवे. आगामी काळात नगरपरिषद निवडणूक होऊन नूतन नगरसेवक या मुद्द्यावरून राजकीय आखाडा तर करणार नाहीत ना, अशी भीतीही आहे.नगरपरिषद सभेच्या कामकाजाचे नियम ५० वर्षे जुने आहेत. त्यात बदलत्या काळानुरुप कोणतीही सुधारणा झालेली नाही. सध्याच्या माहितीचा स्फोट झालेल्या युगात हे नियम कालबाह्य ठरत आहेत. नगरपालिकेकडून नागरिकांच्या असलेल्या अपेक्षांमध्ये वाढ होत आहे. नगरपालिकांच्या कामकाजाबाबत नागरिक जागरुक होत आहेत.अशा परिस्थितीमध्ये कालबाह्य नियमांचा आधार घेवून नगरपालिका सभांचा संपूर्ण इतिवृत्तांत तयार न करणे, सभांची माहिती प्रसिध्द न करणे, यामुळे नागरिक आणि प्रशासनामध्ये वारंवार वादाचे प्रसंग उद्भवत आहेत. माहिती अधिकार कायद्याने नगरपालिकेतील प्रशासकीय माहिती सर्वांसाठी खुली झाली असली तरी लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी सभागृहात नेमके काय करतात?याबाबत प्रसिद्धी माध्यमांतून येणाऱ्या या माहितीवरच लोक विसंबून असतात. त्यामुळे भरमसाठ आश्वासने देवून, अर्थशक्ती, धनशक्ती वापरुन निवडून येणारे मात्र पाच वर्षे नगरपालिकेच्या सभांत तोंड न उघडणाऱ्या या नगरसेवकांची अकार्यक्षमता झाकली जात होती.नगरपालिका सभांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग प्रसिद्ध होण्यामुळे मौनी नगरसेवकांचे बिंग फुटणार आहे. आपल्या प्रभागाच्या नागरी सुविधा आणि समस्यांबाबत नगरसेवकांना आता नगरपालिकेत तोंड उघडावेच लागणार आहे.लोकशाही अधिकाधिक लोकाभिमुख व लोकसहभागी होण्यासाठी लोकप्रतिनिधीगृहात ग्रामसभेच्या धरतीवर वॉर्डसभा, क्षेत्रसभा होणे महत्वाचे आहे, यासाठी सुद्धा आमचा लढा सुरू असून नगरपरिषद संचालनालय याबाबत अजून कायदेशीर पेचामध्ये अडकवले गेले आहे, याची खंत आहे.जन आंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयाचे मेधा पाटकर, सुनिती सु. र, इब्राहिम खान, युवराज गटकल, प्रसाद बागवे यांनी राज्य स्तरावर आंदोलने करत हा विषय लावून धरला. तर बार्शीचे माहिती अधिकार कार्यकर्ते दीनानाथ काटकर,दयानंद पिंगळे, आकाश दळवी, बालाजी डोईफोडे, सुहास कांबळे आदी बार्शी स्तरावर आंदोलने करत आहेत. या सर्वांमुळे व्यवस्थेमध्ये संविधानिक मूल्यांच्या मार्गानुसार बदल करू शकलो, याचा मनापासून आनंद आहे.

# देशाच्या प्रगतीत व संरक्षणात सैनिकांचे अमुल्य योगदान–जिल्हाधिकारी विनय गौडा

## सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

देशाच्या सीमा सुरक्षित राहिल्यास आपला देश आणि नागरिक सुरक्षित राहू शकतात. सीमेचे रक्षण करणाऱ्या सैनिकांमुळेच आपला देश प्रगतीकडे वाटचाल करत आहे. देशाच्या प्रगतीत व संरक्षणात सैनिकांचे अमुल्य योगदान असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले. नियोजन भवन सभागृह येथे सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाच्या शुभारंभाप्रसंगी ते बोलत होते.यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, महानगरपालिकेचे आयुक्त विपीन पालीवाल, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, जिल्हा विधीसेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कॅप्टन दीपक लिमसे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर नंदनवार प्रामुख्याने उपस्थित होते.आंतरसुरक्षा व बाह्यसुरक्षेशिवाय कोणताही देश प्रगती करु शकत नाही, सीमेचे रक्षण करणा–या सैनिकांमुळेच आपला देश प्रगतीकडे वाटचाल करत आहे, असे सांगून जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले. या स्वातंत्र्यात तिन्ही सशस्त्र दलाचे बलिदान अमुल्य आहे. शहीद सैनिक व माजी सैनिकांच्या परीवाराच्या कल्याणासाठी दरवर्षी सशस्त्र ध्वजदिन निधी संकलीत केला जातो. ध्वजदिन निधी संकलन करणे हे सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी छोटेसे पाऊल आहे. या माध्यमातून माजी सैनिक व त्यांच्या कुटूंबियांच्या कल्याणासाठी मदत होणार आहे. मागील वर्षी १३२ टक्के निधीचे संकलन झाले असून यावर्षी देखील दिलेल्या उद्दिष्टापेक्षा जास्त ध्वजनिधी संकलीत केला जाईल, असे त्यांनी आश्वस्त केले.पोलीस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी म्हणाले, जवान देशाच्या सीमेवर तैनात असल्याने नागरीक सुरक्षित असून देशाच्या सिमा भक्कम आहेत. विद्यार्थी दशेपासूनच ध्वजनिधी संकलन केल्या जात आहे. या ध्वजनिधीतून माजी सैनिक व त्यांच्या कुटूंबियासाठी कल्याणकारी व उपयोगी कामे, त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणासाठी मदत करणे आदी कामे ध्वजनिधी संकलनातून केल्या जातात. सैनिक हे प्रेरणास्त्रोत असून त्यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही प्रशासन सदैव त्यांच्या पाठीशी राहील असेही ते म्हणाले.निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार म्हणाले, कुटूंबापासून दूर राहून प्रतिकुल परिस्थितीतही देशाची सुरक्षा करण्याची महत्वाची जबाबदारी सैनिक अहोरात्र करीत असतात. सैनिकांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या कोणत्याही समस्या असतील तर त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबध्द असल्याचे पवार म्हणाले.जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कॅप्टन दीपक लिमसे यांनी प्रास्ताविकेतून बोलतांना म्हणाले, सैनिक कुटूंब व आप्तेष्टांपासून दूर राहून विषम व भौगोलिक परीस्थितीत देशाच्या सीमेचे प्राणपणाने रक्षण करीत असतो. त्यामुळेच आपण आपल्या जीवनाचा निंवात व निश्चिंतपणे आस्वाद घेऊ शकतो. या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते. युद्ध असो वा नसो देशातंर्गत होणाऱ्या अतिरेकी कारवायांवर सुद्धा त्यांना नजर ठेवावी लागते. तसेच पुरजन्य, दुष्काळ परिस्थितीत सुद्धा या सैनिकांची मदत घेतली जाते असेही ते म्हणाले. या निधीतून युद्धात धारातीर्थी पडलेल्या सैनिकांच्या वारसांना आर्थिक मदत करणे, शहीद व सेवारत सैनिकांच्या परिवारांना मदत, त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणासाठी मदत करणे, माजी सैनिकांच्या कुटूंबियांना चरितार्थ चालविण्यासाठी मदत या निधीतून करण्यात येत असल्याची माहिती कॅप्टन लिमसे यांनी दिली. कार्यक्रमाचे संचालन हेमंत शेंडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार देवानंद काळबांडे यांनी मानले. कार्यक्रमाला माजी सैनिक बहूउद्देशिय संस्थेचे अध्यक्ष हरिष गाडे, पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष सुरेश बोबाटे, जयहिंद माजी सैनिक संघटनेचे विजय तेलरंगे तसेच जिल्ह्यातील माजी सैनिक, वीरमाता, वीरपीता, वीरनारी व विविध कार्यालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते.



**वीरपत्नी/वीरमाता/ वीरपिता/ शौर्यपदक धारकांचा सत्कार:** याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वीरपत्नी वेंकम्मा गोपाल भिमनपल्लीवार व त्यांची विधवा मुलगी सरोजा हनमलवार, अरुणा सुनिल रामटेके, वीरमाता शिला सुदाम कोरे, पार्वती डाहुले, छाया बालकृष्ण नवले, वीरपिता वसंतराव डाहुले, बालकृष्ण नवले तसेच शौर्यचक्राने सन्मानित माजी नायब सुबेदार शंकर मेंगरे यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच मागील वर्षीच्या ध्वजदिन निधी संकलनात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शासकीय आस्थापनांचा देखील याप्रसंगी भेटवस्तू देवून सत्कार करण्यात आला.

## केपीसीएलने करारावर त्वरीत अंमल करावा तसेच वेकोलिने केंद्रीय नितीनुसार कार्यवाही करावी– हंसराज अहीर

### जिल्हा प्रशासनास प्रलंबित प्रश्न व सुनावणीचा आढावा घेण्याचे निर्देश



**चंद्रपूर । प्रतिनिधी.**

वेकोलि बल्लारपूर क्षेत्रातील सास्ती व धोपटाळा तसेच चंद्रपूर क्षेत्रातील भटाळी खाणीशी संबंधित ओबीसी व अन्य प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रश्न वेकोलि प्रबंधनाच्या चुकीमुळे प्रलंबित असल्यामुळे या प्रकल्पग्रस्तांची नाहक ससेहोलपट सुरु आहे. जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश असतांनाही वेकोलि अधिकारी या आदेशांचे उल्लंघन करीत असल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालुन वेकोलिच्या या प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची प्रशासकीय स्तरावरुन कार्यवाही करावी आणि वेकोलिने केंद्रीय नितीनुसार तसेच केपीसीएलने महाराष्ट्र सरकारच्या करारावर त्वरीत अंमल करावा असे निर्देश राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी दिले.स्थानिक शासकीय विश्रामगृहात दि. ०७ डिसेंबर, २०२३ रोजी सास्ती, धोपटाळा व भटाळी माईन्सशी संबंधित प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांवर जिल्हाधिकारी यांचेशी चर्चा करताना अहीर यांनी निर्देश दिले की, जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून जे सर्व्हेक्षण व प्रकल्पग्रस्तांची ही यादी वेकोलि प्रबंधनास सादर केली व अवार्ड मध्ये जी नावे नमुद आहेत. ती ग्राह्य धरुन वेकोलिने सर्वांना मोबदला व नोकऱ्या दिल्या पाहिजे. जिथे ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी कमी आहेत तिथे तुकडेबंदीचा आधार घेवून वेकोलि नोकऱ्या व मोबदला देण्यासाठी टाळाटाळ करीत होती हे चुकीचे असून नुकतेच माननिय उच्च न्यायालयाने आदेश पारित करुन वेकोलिला या संबंधात महसुल अधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकतानांच एसडीओ व तहसिलदार यांचे आदेश ग्राह्य मानत कार्यवाही करण्याचे निर्देश वेकोलिला असतांना त्यावर अंमलबजावणी होत नसल्याने जिल्हा प्रशासनाने यात लक्ष घालुन पिडीत प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याकरीता कार्यवाही करावी अशा सुचनाही जिल्हाधिकाऱ्यांना केल्या.. यावेळी एनसीबीसी अध्यक्षांनी एम्टाशी संबंधित प्रलंबित विषयांवर सुध्दा चर्चा केली साडे पाच महिन्यांपुर्वी आयोगाने सुनावणी घेतली होती. त्यानुसार सुचिबध्द कामास सुरुवात झाली असून काही याद्या तयार झाल्या आहेत. अनेक बाबींवर कार्यवाही झाली असून काही कामे प्रलंबित आहेत काही कामगारांना नोकरी देवून वेतन दिले जात आहे परंतु अजुनही अनेक बाबी प्रलंबित असल्याची माहिती या चर्चेदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांना अवगत करण्यात आले. याविषयी झालेल्या सुनावणीचा आढावा घेवून कार्यवाहीकरीता प्रशासनाने तत्पर रहावे अशी सुचना केली. यावेळी वरोराचे उपविभागीय अधिकारी, जिल्हा पुनर्वसन अधिकारी, भाजपा किसान मोर्चा चे जिल्हाध्यक्ष राजु घरोटे यांची उपस्थिती होती.

**केपीसीएल च्या प्रलंबित प्रश्नांवर २२ डिसेंबर रोजी आयोगाच्या कार्यालयात बैठक**
**शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रश्न, पुनर्वसन विषयक बाबींवर येत्या २२ डिसेंबर, २०२३ रोजी नवी दिल्ली येथे आयोगाव्दार केपीसीएल (एम्टा) प्रश्नी कर्नाटक सरकारचे मुख्य सचिव, उर्जा मंत्रालयाचे सचिव यांची बैठक घेण्यात येणार असून या बैठकीमध्ये सकारात्मक निर्णय होण्याची शक्यता एनसीबीसी अध्यक्ष हंसराज अहीर यांनी व्यक्त केली.**

## डोंगरगाव (रेल्वे) येथे राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांचा ५५ वा पुण्यस्मरण सोहळा

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यातील डोंगरगाव रेल्वे येथे २७ नोव्हेंबर ते ०३ डिसेंबर पर्यंत विविध रचनात्मक उपक्रमांनी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ५५ वा पुण्यस्मरण सोहळा साजरा करण्यात आला.

अखिल विश्वाला मानवतेचा संदेश देणारे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी सांगितलेल्या तत्वप्रणाली प्रमाणे श्री गुरुदेव सेवा मंडळ डोंगरगाव (रेल्वे) येथील आयोजक मंडळींनी घेतलेल्या या सात दिवशीय पुण्यस्मरण सोहळ्यामध्ये अनेक नामवंत कीर्तनकारांनी कीर्तन रुपी सेवा गावकऱ्यांना दिली. त्या मध्ये वरोरा येथील पाचगाव चे आशिष माणूसमारे, प्रशांत क्षीरसागर, सुनील लांजुळकर, प्रदीप चौधरी यांचे किर्तन झाले व अनिरुध्द सूर्तेकर यांचा अभंग गायनाचा कार्यक्रम देखील झाला. त्यासोबतच गावातील मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा व त्यांच्यातील असणाऱ्या सुप्त गुणांना वाव मिळावा या उद्देशाने विविध स्पर्धा सुध्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.त्यामध्ये सामान्य ज्ञान स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, गीतगायन स्पर्धा या यशस्वीरीत्या पार पाडल्या गेल्या.त्या सोबत रक्तदान हेच श्रेष्ठदान हे ब्रीद अनुसरून पहील्यांदाच गावामध्ये रक्तदान शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले होते. त्यात गावातील तब्बल ३५ रक्तदात्यांनी रक्तदान केले व आपण खरच राष्ट्रसंतांना अपेक्षित असलेल्या सेवाभावी वृत्तीचे लोकं आहोत हे दाखवून दिले. तसेच गावातील भजन मंडळांचा भजनांचा देखील कार्यक्रम त्यावेळी झाला. दिनांक ०३ डिसेंबर ला काल्याच्या निमित्ताने गावातील गुणी जणांचा सत्कार देखील करण्यात आला. त्यात प्रामुख्याने गावातीलच सुपुत्र आर्मी रिटायर्ड हेमराज बेहेरे, गावातील शिक्षक विजय कामटकर, प्रा. प्रफुल आपटे यांचा सत्कार करण्यात आला. व गावातील जुन्या गुरुदेव कार्यकर्त्या चा देखील सत्कार करण्यात आला. तसेच विविध आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये विजय प्राप्त केलेल्या स्पर्धकांना गौरवचिन्ह देऊन बक्षीस वितरण केले. या प्रसंगी व्यासपीठावर गावातील प्रमुख पाहुणे उपस्थित होते. हा ५५ वा पुण्यस्मरण सोहळा यशस्वीरीत्या पार पडला. यात आयोजक कमिटीतील अध्यक्ष रोशन काळे,उपाध्यक्ष शुभम चिकटे, सचिव विक्रम बेहरे, कोषाध्यक्ष प्रदुम मिलमिले, सदस्य चंद्रभान घुगल, मेघराज काळे, दीपक आपटे, गजानन दरेकर, गिरिधर बेहरे, राकेश काळे, योगेश खिरटकर, शैलेश खिरटकर, प्रतीक सोमालकर, यांनी उपस्थित सर्वांचे या प्रसंगी आभार व्यक्त केले.तसेच गावातील निष्ठावंत कार्यकर्ते प्रफुल साळवे, हितेश चंद्रभान घुगल, राहुल काळे, आर्यन मारेकर व इतर कार्यकर्त्यांचे देखील सहकार्य या कार्यक्रमासाठी लाभले. ह.भ.प केशव खिरटकर यांनी या पुण्यस्मरण सोहळ्याच्या आयोजना मागील उद्देश व रूपरेषा उपस्थित सर्व लोकांना समजावून सांगितली होती. व हा कार्यक्रम सर्व गावाकऱ्यांच्या सहकार्याने योग्य व यशस्वीरित्या कार्यक्रम पार पडला.




## ४ वेळा अपयश तरी मानली नाही हार...!

# सालोरी गटग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी शिवसेनेचे गजानन देहारी विराजमान



**जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे**

**आमचे जेष्ठ शिवसैनिक गजानन देहारी यांना ४ वेळा अपयश येऊन सुद्धा त्यांनी अपयशाला न खचता जिद्दीने समोर जाऊन यश संपादन केले आहे. हि खूप कौतुकास्पद बाब आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा घेऊन आजच्या तरुण पीडीने सुद्धा कुठल्याही क्षेत्रात आलेल्या अपयशाला न खचता आपले प्रयत्न सुरु ठेवावे एक दिवस यश नक्की तुमच्या पदरी पडेल याचेच हे एक उदाहरण गजाननजी देहरी यांच्या माध्यमातून समोर आले आहे.**

**वरोरा । प्रतिनिधी**

ग्रामपंचायत निवडणुकीत ४ वेळा अपयश आले मात्र वारंवार येणाऱ्या अपयशाला न डगमगता पाचव्यांदा निवडणुकीच्या रिंगणात उतरून घवघवीत यश प्राप्त संपादन करून थेट सालोरी गट ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदावर शिवसेना (उबाठा ) चे गजानन देहारी विराजमान झाले आहे.त्यांच्या निवडीबद्दल शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांनी अभिनंदन केले आहे. तालुक्यातील सालोरी गटग्रामपंचायतची निवडणूक नुकतीच संपन्न झाली.या निवडणुकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) गटाचे ३ उमेदवार विजयी झाले आहे. यातीलच गजानन देहारी यांनी ग्रामपंचायत निवडणुकीत ४ वेळा उमेदवार म्हणून सहभाग घेतला मात्र त्यांचा ४ वेळा अपयश हाती आले होते. मात्र वारंवार येणाऱ्या अपयशाला कुठेही न डगमगता त्यांनी यावर्षीच्या ग्रामपंचायत निवडणुकीत सहभाग घेतला आणि मोठ्या मताधिक्याने यश संपादन केले आणि उपसरपंच पदासाठी त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी वरोरा -भद्रावती विधानसभा संघटक सुधाकर मिलमिले व आदी शिवसैनिक उपस्तिथ होते.

## वंधली येथे निशुल्क नेत्र तपासणी व मोतीबिंदू तपासणी शिबिर संपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष व माजी सरपंच वंधली मिलिंद भोयर यांच्या नेतृत्वात समाजभवन वंधली येथे समता फाउंडेशन मुंबई आणि ग्रामपंचायत वंधली व गोदावरी ऍग्रो एजन्सी वरोरा यांच्या संयुक्त सहकार्याने निशुल्क आयुष्यमान भारत गोल्ड कार्ड शिबिर व नेत्र तपासणी व मोतीबिंदू तपासणी शिबिर तसेच शाश्वत शेती बद्दल शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन शिबिर सांस्कृतिक भवन वंधली येथे संपन्न झाले.

वंधली ग्रामपंचायत सरपंच प्रविण भोयर यांच्या अध्यक्षतेखाली नि;शुल्क आयुष्यमान भारत गोल्ड कार्ड शिबीर,नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर, शाश्वत शेती बद्दल योग्य मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला ग्रामपंचायत उपसरपंच अनिल ठावरी, वरोरा तालुका कांग्रेस अध्यक्ष तसेच माजी ग्रामपंचायत सरपंच मिलिंद भोयर, ग्रामपंचायत सदस्य सागर भोयर, सुचीता कुमरे ग्रामपंचायत सदस्या वंधली यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.या शिबिराचे खास वैशिष्ट्ये म्हणजे शिबिरामध्ये सहभागी झालेल्या रुग्णाची निशुल्क तपासणी योग्य सल्ला मार्गदर्शन, मोतीबिंदू असलेल्या ४५ रुग्णांची निशुल्क शस्त्रक्रियेसाठी निवड,शेतकरी बांधवांसाठी शाश्वत शेती बद्दल मार्गदर्शन, आयुष्यमान भारत गोल्डन कार्ड त्वरित तयार करून वाटप करण्यात आले.यावेळी डॉ.हनुमंत कुळसंगे, ओमकार दिग्रसकर, परेश आडगावकर, गोदावरी ऍग्रो एजन्सी चे संचालक समीर वानखेडे, समता फाउंडेशन मुंबईचे ज्ञानेश्वर चव्हाण, संकेत भोयर सेवा सहकारी सदस्य वंधली ,ग्रामपंचायत कर्मचारी अतुल धोटे आणि प्रविण पिसाळकर,ग्रामपंचायत माजी सरपंच कमलबाई धोटे, आरोग्य कर्मचारी चिकटे , चिवंडे, वनहक्क समीती अध्यक्ष कमलाकर नैताम, आय सी आर पी सविता चौधरी तसेच महीला बचत गटातील महिला व समता फाउंडेशन मुंबई सर्व टीम व गावातील नागरिक व लाभार्थी उपस्थित होते. या शिबिराचा लाभ माढेळी ,आंबडी,निलजई , वंधली,गिरसावळी,लोणगाडगा, आशी, पाझुणी,नांद्रा,चरुरखटी,एकोणा , वनोजा व परिसरातील दहा ते बारा गावातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.



# ११ डिसेंबर काँग्रेसचा विधानभवनावर हल्ला बोल मोर्चा

## काँग्रेस पदाधिकाऱ्यासह हजारोच्या संख्येने युवक, महिला, शेतकरीही होणार सहभागी

**गडचिरोली । प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने राज्यातील शेतकरी, महिला, युवक, यांच्या समस्या, वाढती महागाई, बेरोजगारी अश्या विविध समस्याना घेऊन ११ डिसेंबर रोजी, नागपूर विधानभवनावर हल्लाबोल मोर्चा काढण्यात येणार आहे.



या मोर्चात गडचिरोली जिल्ह्यातून हजारोच्या संख्येने काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला, युवक आणि शेतकरी सुद्धा जिल्ह्यातील विविध मागण्याना घेऊन सहभागी होणार असून त्या अनुषंगाने गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटीची नियोजन बैठक आज पत्रकार भवनाच्या सभागृहात पार पडली.या बैठकीला अध्यक्ष म्हूणन जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे, माजी खासदार मारोतराव कोवासे, मोर्चाचेविधानसभा निहाय निरीक्षक म्हणून गडचिरोली विनायक बांगडे, आरमोरी चंद्रशेखर ठवरे, अहेरी विजय नळे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी महासचिव डॉ. नामदेव किरसान, महिला काँग्रेस प्रदेश सचिव डॉ. चंदा कोडवते, काँग्रेसचे जेष्ठ नेते ॲड. रामभाऊ मेश्राम, महिला जिल्हाध्यक्ष ॲड. कविता मोहरकर, युवक काँग्रेस प्रदेश सचिव विश्वजीत कोवासे, शहर अध्यक्ष सतीश विधाते, जि. प. माजी उपाध्यक्ष तथा कुरखेडा तालुकाध्यक्ष जीवन पा. नाट, आरमोरी तालुकाध्यक्ष मिलिंद खोब्रागडे, वडसा राजेंद्र बुल्ले, चामोर्शी प्रमोद भगत, गडचिरोली वसंत राऊत, सहकार सेल अध्यक्ष अब्दुलभाई पंजवाणी, किसान सेल अध्यक्ष, वामनराव सावसाकडे, ग्राहक सेल अध्यक्ष भारत येरमे, अनुसूचित जाती सेल अध्यक्ष रजनीकांत मोटघरे, काँग्रेस नेते प्रभाकर वासेकर, पांडुरंग घोटेकर, देवाजी सोनटक्के, कविता भगत, वैशाली ताटपल्लीवार, गुलाब मडावी, हरबाजी मोरे, प्रशांत कोराम, अनिल कोठारे, श्रीकांत कथोटे, रामभाऊ नन्नावरे, भैय्याजी मुद्दमवार, नरेंद्र गजपुरे, कृष्ण झंजाळ, नृपेश नांदनकर, सुभाष धाईट, बंदोपन्त चिटमलवार, रमेश धकाते, दुशांत वाटगुरे, रवी मेश्राम, दिलीप फुलबंधे, लक्ष्मण कोवे, गणेश कोवे, प्रफुल आंबोरकर, लालाजी सातपुते, संदीप भोयर, अतुल गेडाम, शैलेश मानकर, घनश्याम रायपुरे, मिलिंद बारसागडे, सह मोठ्या संख्येने काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

**हल्ला बोल मोर्चा, जिल्ह्यातील या असतील प्रमुख मागण्या–** मेडिगट्टा धरणामुळे गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर होत असलेले अन्याय दूर करण्यात यावे.जिल्ह्यातील नरभक्षक वाघांचा व रानटी हत्तींचा तातडीने बंदोबस्त करण्यात यावा.या वर्षीच्या खरीप हंगामाकरीता सरसकट दुष्काळ जाहिर करुन एकरी ५० हजार रुपये मदत द्या.कोनसरी प्रकल्प सुरु झाल्याशिवाय जिल्ह्यातील सुरजागडचा कच्चा माल परराज्यात किंवा जिल्ह्याबाहेर नेऊ नये.कोनसरी परिसरातील जमिनींचे सरसकट अधिग्रहण रद्द करा.कोनसरी प्रकल्प तात्काळ सुरू करून जिल्ह्यातील स्थानिक युवकांना रोजगार देण्यात यावे. सुरजागडच्या वाहतूकीमुळे झालेल्या अपघातांची चौकशी करुन लॉयड मेटल कंपनीवर गुन्हे दाखल करा. जिल्ह्यातील राष्ट्रीय व राज्य महामार्गाचे तातडीने दुरुस्ती करण्यात यावी व प्रलंबित विकास कामांना निधी उपलब्ध करून देण्यात यावे.उत्खननामुळे होणाऱ्या पर्यावरणाच्या नुकसानीची आणि प्रदुषण महामंडळाकडून चौकशी करण्यात यावी. विनाअट सर्व पिकांकरीता सर्व शेतकऱ्यांना पिकविमा मंजूर करा. अवकाळी पाऊस व गारपिट ग्रस्त सर्व शेतकऱ्यांना प्रती एकरी ५० हजार रुपये मदत द्या. फडणवीस सरकारच्या काळातील फसव्या कर्जमाफी योजनेतून सुटलेल्या पात्र शेतकऱ्यांना तात्काळ कर्जमूक्त करा. नियमित कर्ज भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेला ५० हजार रुपयांचा प्रोत्साहन निधी तात्काळ द्या. पिक कर्जासाठी लागू करण्यात आलेली सिबीलची अट तात्काळ रद्द करा.पिकांची नासाडी करणाऱ्या जंगली जनावरांचा बंदोबस्त करा अथवा नुकसान भरपाईसाठी पिकविमा लागू करा.सर्व सरकारी कर्मचाऱ्यांची जूनी पेंशन योजना विना अट लागू करा.नविन आकृतीबंद नुसार मंजूर असलेल्या सर्व विभागातील रिक्त पदांची भरती करा. रोजगार मिळेपर्यंत राज्यातील सर्व बेरोजगारांना दरमहा ५ हजार रु. भत्ता लागू करावा.सरकारच्या विविध विभागात कार्यरत असलेले कंत्राटी कर्मचारी व अधिकारी यांचे शासकीय सेवेत समायोजन करा. राज्यातील अंगणवाडी सेविका / मदतनीस, आशा वर्कर व ग्रामरोजगार सेवक यांच्या प्रलंबित मागण्या त्वरीत मंजूर करा.सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची प्रलंबित शिष्यवृत्ती त्वरीत अदा करा.राज्यातील बेघर नागरिकांना सरसकट घरकूल योजनेचा लाभ द्या.राज्यातील वाढती महागाई तसेच गॅस.पेट्रोल व डिझेलचे वाढलेले दर कमी करा.सर्वसामाजिक प्रश्नांची सोडवणूक करण्याकरीता जात निहाय जनगणना करा.

## माफसुचे संग्रहालय जनतेसाठी खुले संग्रहालय म्हणजे विज्ञानाची तीर्थक्षेत्रे–डॉ.नितीन पाटील



**नागपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे संग्रहालय म्हणजे केवळ शेतकरी, पशुपालक, संशोधक यांचेसाठी रंजक माहितीचे संसाधन नसून शालेय विद्यार्थ्यांसाठी विज्ञान युगातील आधुनिक तीर्थक्षेत्र असल्याचे मत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांनी २३ व्या विद्यापीठ स्थापना दिनाचे औचित्याने आयोजित कार्यक्रमात केले. यावेळी माफसूच्या वतीने सेमिनरी हिल्स येथील विद्यापीठ ग्रंथालय परिसरात उभारलेल्या विद्यापीठाचे संग्रहालय जनतेला पाहण्यासाठी खुले असल्याचे प्रतिपादन केले. पशुवैद्यकीय विद्यापीठामार्फत ज्ञान प्रसारणासाठी स्थापन करण्यात आलेले हे सुरेख संग्रहालय सांघिक प्रयत्नातून निर्माण झाल्याचे संचालक विस्तार शिक्षण, माफसू तथा संग्रहालय समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल भिकाने यांनी यावेळी आपल्या प्रास्ताविक भाषणात सांगीतले.

माफसू विद्यापीठांतर्गत पशुवैद्यकीय, दुग्धतंत्रज्ञान आणि मत्स्यविज्ञान विद्याशाखांचे पदवी आणि पदव्युत्तर उच्च शिक्षण प्रदान केले जाते, या संकल्पनेवर या तिन्ही घटकांची माहिती विविध आकर्षक माहितीफलक, प्रारूप प्रतिकृती, पुतळे यांच्या माध्यमातून विविध दालनात मांडली आहे. याव्यतिरिक्त टॅक्सीडर्मी, वन्यजीव संवर्धन, प्रेक्षागृह आदी विभाग विशेष प्रेक्षणीय आहेत. नागपूर शहरात मध्यवर्ती संग्रहालय, मानववंश संग्रहालय, रेल्वे संग्रहालय, रमण विज्ञान केंद्र अशा नामांकित संग्रहालयाच्या जोडीला माफसू विद्यापीठाचे संग्रहालय प्रेक्षकांसाठी पर्वणीच ठरणार असल्याने अधिकाधिक संख्येने भेटी देण्याचे आवाहन विद्यापीठाचे वतीने करण्यात आले आहे.याप्रसंगी संचालक शिक्षण तथा पशुविज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. शिरीष उपाध्ये, कुलसचिव तथा संचालक संशोधन डॉ. नितीन कुरकुरे, अधिष्ठाता (मत्स्यविज्ञान), डॉ. सचिन बोंडे, पशुवैद्यक महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. आरजू सोमकुवर, मत्स्यविज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुधीर कविटकर, नियंत्रक (वित्त व लेखा) मनिषा शेंडे, विद्यापीठ ग्रंथपाल सुनिल गावंडे, परिक्षा नियंत्रक डॉ. भुषण रामटेके आदी मान्यवरांसह संग्रहालय निर्मिती समितीचे सदस्य, विद्यापीठातील अधिकारी वृंद तथा कर्मचारी उपस्थित होते. संग्रहालय निर्मितीत मोलाचे योगदान देणारे कलाकर प्रशांत जेपुलकर यांचा कुलगुरू यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संग्रहालय समितीचे सचिव डॉ सारिपुत लांडगे यानी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विस्तार संचालनालयाचे डॉ गितांजली ढुमे, प्रविण बागडे, मोहन कापसे, सुशील जांभुळे आदींनी अथक परिश्रम घेतले.

## २ लाखांचे बक्षीस असलेल्ल्या एका जहाल माओवाद्यास अटक

**गडचिरोली । प्रतिनिधी**

दिनांक ०२ ते ०८ डिसेंबर रोजी दरम्यान माओवादी हे पीएलजीए सप्ताह साजरा करतात. या दरम्यान ते सरकारी मालमत्तेचे नुकसान करणे, पोलीस दलावर हल्ले करुन त्यांच्या जवळील शस्त्रे लुटून नेणे, रस्ते व इतर प्रकारच्या सरकारी कामात अडथळा आणून जाळपोळ करणे इ. देशविघातक कृत्य करत असतात.६ डिसेंबर रोजी जहाल माओवादी नामे महेंन्द्र किष्टय्या वेलादी, वय ३२ वर्षे, रा. चेरपल्ली, तह. भोपालपट्टनम, जि. बीजापूर (छत्तीसगड) हा उपपोस्टे दामरंचा जवळ असलेल्या इंद्रावती नदीजवळ पोलीस पार्टीच्या हालचालींबाबतची माहीती देण्याच्या उद्देशाने फिरत असल्याच्या मिळालेल्या गोपनिय माहीतीच्या आधारे विशेष अभियान पथकाचे जवान, सीआरपीएफ ९ बटालियन जी कंपणीचे जवान व उपपोस्टे दामरंचा पोलीस पार्टीच्या जवानांनी माओवाद विरोधी अभियान राबवून त्यास अटक केली.



अधिक तपासात असे दिसून आले की, तो दामरंचा व मन्नेराजाराम या दोन्ही पोस्ट पार्टीच्या जवानांच्या नियमित कामकाजाच्या हालचालींवर पाळत ठेवून त्यांच्यावर हल्ला करण्याच्या उद्देशाने अहेरी दलमच्या माओवाद्यांना माहिती पुरवीत होता. त्याचा २०२३ च्या सुरवातीला झालेल्या कापेवंचा ते नैनेर जंगल परिसरात वन अधिकाऱ्यांवर दरोडा, हल्ला आणि जाळपोळ करण्याच्या घटनेमध्ये त्याचा प्रत्यक्ष सहभाग होता हे उघड झाले आहे. त्यानुसार त्यास उपपोस्टे राजाराम (खां) तह. अहेरी, जि. गडचिरोली येथे दाखल अप. क्र. १/२०२३ कलम ३९७, ३३२, ३५३, ३४१, ३२४, ३२३, १२० (ब), ४२७, ४३५,१४३, १४७, १४८, १४९, ५०६, १८६ भादवी, ३/२५ भारतीय हत्यार कायदा, १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा व ०७ क्रिमीनल लॉ अमेंडमेंट अन्वये गुन्हात अटक करण्यात आली आहे.गडचिरोली पोलीस दलाच्या प्रभावी कारवाईमुळे माहे जानेवारी २०२२ ते आतापर्यंत एकुण ७२ माओवाद्यांना अटक करण्यात गडचिरोली पोलीस दलास यश आलेले आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नीलोत्पल . अपर पोलीस अधीक्षक (अभियान) यतिश देशमुख ,अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) कुमार चिंता सा. अपर पोलीस अधीक्षक, अहेरी एम. रमेश यांचे मार्गदर्शनाखाली पार पडली. तसेच पोलीस अधीक्षक यांनी माओवाद्यांना माओवादाची हिंसक वाट सोडुन आत्मसमर्पण करुन सन्मानाने जीवन जगण्याचे आवाहन केले आहे.

# ना.सुधीर मुनगंटीवार होणार ‘गुड गव्हर्नन्स’ पुरस्काराने सन्मानित

## संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार गौरव

### कर्तृत्वाचा गौरव

**ना. मुनगंटीवार यांना १९९९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेचे सर्वश्रेष्ठ वक्ता म्हणून गौरविण्यात आले होते. यासोबतच दि नॅशनल फेडरेशन ऑफ द ब्लाईंडचा मेमोरियल अवॉर्ड आफ्टरनून व्हॉईसच्या वतीने बेस्ट परफॉर्मिंग पॉलिटिशियन, लोकमत आणि ज्युनियर चेंबर इंटरनॅशनलच्या वतीने ‘मॅन ऑफ द इयर’,महाराष्ट्राच्या आर्थिक क्षेत्रातील प्रगतीसाठी इंडिया टूडे सारख्या प्रतिष्ठीत समूहाने दोन वेळा पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. मॅग्ना प्रकाशन संस्था व होथूर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने ‘सोसायटी एक्सलेन्स’ दिव्यांगांच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल लेफ्टनंट जी. एल. नर्डेकर स्मृती पुरस्कार, वृक्षलागवडीच्या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल छाया दीक्षित फाउंडेशन चा विशेष पुरस्कार ,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील दीर्घ सेवेसाठी कर्मवीर मा. सा. कन्नमवार स्मृती पुरस्कार, बॉम्बे स्टॉक एक्सचेंज द्वारा व्यापार मित्र पुरस्कार अशा विशेष पुरस्कारांनीही त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.**



### चंद्रपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा

**चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांना यापूर्वीही अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. आता आणखी एका प्रतिष्ठेच्या पुरस्काराची भर पडल्यामुळे चंद्रपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे, अशी ऊत्स्फूर्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.**

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

दि सीएसआर जर्नलच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा सीएसआर जर्नल एक्सलन्स अवॉर्ड राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांना प्रदान केला जाणार आहे. या पुरस्काराचे हे सहावे वर्ष आहे. ना. सुधीर मुनगंटीवार यांना ‘दि सीएसआर जर्नल चॅम्पीयन ऑफ गुड गव्हर्नन्स’ हा पुरस्कार सुशासन (सर्वोत्तम प्रशासन) राखण्यात यशस्वी ठरत असल्याबद्दल दिला जात आहे.मुंबईतील बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज येथे येत्या शनिवार, दि. ९ डिसेंबरला देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ना. मुनगंटीवार यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. प्रशासनाला विश्वासात घेऊन प्रत्येक शासकीय योजना, अभियान आणि उपक्रमांचा लाभ थेट जनतेपर्यंत पोहोचविण्यात ना. मुनगंटीवार यांचा विशेष हातखंडा आहे. राज्य सरकारची कल्याणकारी योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यापासून ते गरजूंना शासनाकडून न्याय मिळवून देईपर्यंत प्रत्येक बाबतीत ते सातत्याने पाठपुरावा करीत असतात. त्यामुळेच दि सीएसआर जर्नलच्या वतीने उत्तम प्रशासनासाठी दिल्या जाणाऱ्या विशेष पुरस्कारासाठी ना. मुनगंटीवार यांची निवड करण्यात आली आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा यामध्ये समावेश आहे. प्रसिद्ध कवी कुमार विश्वास, क्रिकेटपटू युवराज सिंह आणि मिथाली राज, अभिनेत्री भूमी पेडणेकर आदींना या विशेष पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.महाराष्ट्राच्या वन,सांस्कृतिक आणि मत्स्यव्यवसाय या तीनही खात्यांचा माध्यमातून ना.सुधीर मुनगंटीवार यांनी ऐतिहासिक अन् धडाडीचे निर्णय घेतले आहे . मग अफजलखानाच्या कबरीचे अतिक्रमण हटविणे असो वाघनखे आणण्याचा केलेला लंडन येथील सामंजस्य करार,रायगडावर भव्यदिव्य केलेला शिवराज्यभिषेक सोहळा तसेच‘हॅलो’ऐवजी ‘वंदे मातरम्’, आपल्या देशातील संसदेला आणि अयोध्येतील श्रीराम मंदिराला चंद्रपूर – गडचिरोली जिल्ह्यातून काष्ठ पाठविण्यासाठी त्यांनी घेतलेला पुढाकार,’जय जय महाराष्ट्र माझा’ या गीताला राज्यगिताचा दर्जा आणि आता घेण्यात येणाऱ्या तालुकास्तरावर राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा अश्या निर्णयामुळे ना. सुधीर मुनगंटीवार हे चॅम्पीयन ऑफ गुड गव्हर्नन्स या पुढाकाराचे खरे मानकरी ठरतात अशी भावना व्यक्त होत आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .